## पुणे फेस्टिव्हल
## सांस्कृतिक महोत्सवांचा कंठमणी

- लोकमान्य टिळकांनी जुलमी ब्रिटीश सत्तेविरूद्ध जनमत संघटित करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात सुरू केला.
- १९८९ मध्ये खा. सुरेश कलमाडी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे अध्यक्ष होते त्यांनी त्या वर्षी पुणे फेस्टिव्हलची सुरूवात केली.
- पुणे फेस्टिव्हलमध्ये गायन, वादन, नृत्य, संगीत, क्रीडा अशा विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन होत असते.
- पुणे फेस्टिव्हलचे संयोजन पुणे फेस्टिव्हल कमिटी, भारत सरकारचा पर्यटन विभाग, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि पुणेकर नागरिकांच्या वतीने होते.
- **मदर ऑफ ऑल फेस्टिव्हल्स –** सर्वाधिक दिवस चालणारा व सर्वाधिक वर्षे सातत्याने चालू असणाऱ्या पुणे फेस्टिव्हलला 'मदर ऑफ ऑल फेस्टिव्हल्स' म्हटले जाते. या पासून प्रेरणा घेऊन देशात अनेक ठिकाणी सांस्कृतिक महोत्सव सुरू झाले.
- **पुणे फेस्टिव्हलमधील कार्यक्रमांचे वैविध्य–**

  राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कलाकारांचे गायन, वादन, नृत्य, लोककलांचे दर्शन, लावणी महोत्सव, उर्दू मुशायरा, मराठी व हिंदी हास्य कवी संमेलन, लोकनाट्य, पाककला स्पर्धा, पुष्परचना, विविध गुणदर्शन, नकला, जादूचे प्रयोग, गणेश देखावा स्पर्धा, स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा, एकपात्री प्रयोग, महाराष्ट्रीय सणांमधील महिलांचे खेळ, महिला महोत्सव, मराठी, हिंदी, गुजराती, इंग्रजी, सिंधी नाटकांचा महोत्सव, मराठी गाण्यांचे कार्यक्रम, गुजराती डायरो, केरळ महोत्सव, लावणी महोत्सव, कोल्हापूर महोत्सव, महाराष्ट्राची लोकधारा, गणेश चित्र प्रदर्शन, व्हिंटेज कार रॅली, जलक्रीडा, बॉडी बिल्डिंग, मोटोक्रॉस, अष्टविनायक रॅली, स्केटिंग स्पर्धा, सायकल स्पर्धा, गोल्फ स्पर्धा, रोल बॉल स्पर्धा, ट्रेकिंग, मल्लखांब, योगा, बैलगाडा स्पर्धा, गावजत्रा, पुण्यातील गुणवंत तसेच उदयास येणाऱ्या कलावंतांचा उगवते तारे व इंद्रधनू कार्यक्रम, भव्य शोभायात्रा, गुणवंतांचा गौरव, पर्यटन विषयक परिसंवाद व कार्यशाळा, शताब्दी साजरी करणाऱ्या गणेशोत्सव मंडळांचा गौरव अशी सारी जंत्री पुणे फेस्टिव्हलच्या वैविध्याची आणि लोकप्रियतेची पावतीच आहे.

- **पुणे फेस्टिव्हलमध्ये कला सादर करणारे कलावंत –**

  पं. भीमसेन जोशी, पं. रविशंकर, पं. हरिप्रसाद चौरसिया, पं. शिवकुमार शर्मा, उस्ताद बिस्मिल्ला खाँ, उस्ताद अमजद अली खाँ, आशा भोसले, हेमामालिनी, मिनाक्षी शेषाद्री, जगजितसिंग, अनुप जलोटा, किशोरी आमोणकर, अनुराधा पौडवाल, बालमुरली कृष्णन, रेमो फर्नांडिस, गुरुदासमान, उदित नारायण, कुमार सानू, उषा उत्थप, पंकज उधास, हरिहरण, लुई बँक्स, शोभा मुदगल, नितीन मुकेश, प्रतिभा प्रल्हाद, शोवना नारायण, रंजना गौहर, भारती शिवाजी, पं. भवानी शंकर, उस्ताद सफाद अहमद खान, पं. राजन– पं. साजन मिश्रा, अलका याज्ञिक, पं. सतीश व्यास, श्यामक दावर, तौफिक कुरेशी, यु. श्रीनिवासन, उस्ताद रशीद खाँ, सिल्व्हा गणेश, पं. विजय घाटे, जतीन ललित, पिनाझ मसानी, आनंदा शंकर, विश्वमोहन भट, पामेला सिंग, सुरेखा पुणेकर, अप्सरा जळगावकर, रोहिणी भाटे, सुचेता भिडे–चाफेकर, श्रीधर फडके, अरुण दाते, मकरंद अनासपुरे, आदेश बांदेकर, प्रशांत दामले, वर्षा ऊसगांवकर, श्रेया घोशाल, कौशिकी चक्रवर्ती, पं. रोणू मुजुमदार आदि नामवंतांचे कार्यक्रम पुणे फेस्टिव्हलची उंची वाढवत गेले.

- **चित्रपट कलावंत व नामवंताचा सहभाग –** दिलीपकुमार, आर.के. लक्ष्मण, एम.एफ.हुसेन, मजरूह सुलतानपुरी, जावेद अख्तर, अली सरदार जाफरी, शशीकपूर, धर्मेंद्र, विनोद खन्ना, कैफी आझमी, माधुरी दीक्षित, सुभाष घई, युक्ता मुखी, रितु बेरी, पूजा भट, आमिषा पटेल, पूजा बात्रा, आदित्य पांचोली, शक्तीकपूर, गोविंदा, अनूपम खेर, शेखर सुमन, बिंदू, फरदीन खाँ, आदिती गोवित्रीकर, अमृता पटेल, रोनित रॉय, सुधा चंद्रन, राणी मुखर्जी, मनिषा कोईराला, बाबासाहेब पुरंदरे, सुरेंद्र शर्मा.

- **पुणे फेस्टिव्हलचे नामवंत उद्घाटक –**

  डॉ. शंकरदयाळ शर्मा, के. आर. नारायणन्, भैरवसिंग शेखावत, सोनिया गांधी, शरद पवार, माधवराव शिंदे, शिवराज पाटील, गुलाम नबी आझाद, के. पी. सिंगदेव, विलासराव देशमुख, रामकृष्ण हेगडे, मनोहर

जोशी, डॉ. पी. सी. अलेक्झांडर, गोपीनाथ मुंडे, सुधाकर नाईक, अमिताभ बच्चन, ऐश्वर्या राय, रेणुका चौधरी, अंबिका सोनी, सुशीलकुमार शिंदे, डॉ. फारुक अब्दुल्ला, सुभाष घई, राज्याचे पर्यटनमंत्री छगन भुजबळ, गिरीश बापट, दिग्विजय सिंग.

- **पुणे फेस्टिव्हल मध्ये उद्योगपतींची उपस्थिती –**

  शंतनुराव किर्लोस्कर, राहुलकुमार बजाज, नीलकंठ कल्याणी, विवेक गोएंका, के. एल. चुघ, खा. विजय मल्ल्या, नीता अंबानी.

- **पुणे फेस्टिव्हलमध्ये गौरवलेले नामवंत –**

  कवी प्रदीप, दिलीपकुमार, योगाचार्य अय्यंगार, विं. दा. करंदीकर, शंतनुराव किर्लोस्कर, लावणीसम्राज्ञी यमुनाबाई वाईकर, कवी मंगेश पाडगांवकर, कवी ना. धो. महानोर, डॉ. विजय भाटकर, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. जब्बार पटेल, नाना चुडासामा, रितु बेरी, रामदास फुटाणे, डॉ. ह. वि. सरदेसाई, नीता अंबानी. आर. के. लक्ष्मण, शोभा डे,कृष्णकांत कुदळे, प्रदीप भिडे, शोवना नारायण, सुरेंद्र चव्हाण, कमलाकर सोनटक्के.

- **पुणे फेस्टिव्हलमध्ये मराठी कवींचा सत्कार** –

  शांता शेळके, नारायण सुर्वे, फ.मुं.शिंदे, विं.दा.करंदीकर, वसंत बापट, मंगेश पाडगांवकर, विठ्ठल वाघ, मा.धो. महानोर, नारायण सुमंत.

- **शताब्दी गणेशोत्सव मंडळे**– पुण्यातील शताब्दी साजरी करणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचा पुणे फेस्टिव्हलच्या उद्घाटन सोहळ्यात गौरव केला जातो.

- **राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन** – श्री गजानन विराजमान झालेल्या पुणे फेस्टिव्हलच्या मंचावर संपुर्ण देशातून आलेले नामवंत उर्दू शायर उर्दू मुशायरा सादर करतात.

- प्रख्यात नृत्यांगना, अभिनेत्री खा.हेमा मालिनी यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कलावंतांचा पुणे फेस्टिव्हलमधील सातत्याचा सहभाग ही देखील विशेष उल्लेखनीय बाब आहे. श्रीमती हेमामालिनी या पुणे फेस्टिव्हलच्या पॅट्रनही आहेत. पुणे फेस्टिव्हलच्या २९ वर्षाच्या इतिहासात हेमामालिनींचे २६ बॅले वा गणेश वंदना सादर झालेले आहे आणि यातही विशेष म्हणजे त्यांचा प्रत्येक पहिला बॅले, पुणे फेस्टिव्हल मध्ये त्या सादर करतात.

- **पुणे फेस्टिव्हलमध्ये कलावंतांची दुसरी पिढी** – पुणे फेस्टिव्हल मध्ये कलावंतांची दुसरी पिढी आता आपली कला सादर करू लागली आहे, नृत्यांगना हेमामालिनी यांच्या कन्या ईशा व आहना, पंडित शिवकुमार शर्मा यांचे चिरंजीव राहुल शिवकुमार, सरोदवादक उत्साद अमजत अली खाँ यांचे चिरंजीव आयान व अमान, पंडित भीमसेन जोशी यांचे चिरंजीव श्रीनिवास अशी कलावंतांची दुसरी पिढी पुणे फेस्टिव्हलचे व्यासपीठ गाजवू लागले आहेत.

- पुणे फेस्टिव्हलमुळे स्थानिक,उगवत्या व नवोदित कलाकारांना हक्काचे मोठे व्यासपीठ मिळाले व त्यातूनच अनेक कलाकार पुढे राष्ट्रीय स्तरावर तसेच अनेक टिव्ही चॅनेलस्‌वर चमकू लागले. पंडित संजीव अभ्यंकर, शौनक अभिषेकी, शर्वरी जेमेनीस, बेला शेंडे, तेजश्री अडिगे, शेफाली लाहोटी, निकीता मोघे असे अनेक राष्ट्रीय पातळीवर चमकणारे कलाकार ही पुणे फेस्टिव्हलचीच देणगी आहे.

- **पुणे फेस्टिव्हलद्वारा प्रज्ञाशोध –** पुणे फेस्टिव्हल मध्ये दरवर्षी ७ ते १४ वर्षे वयोगटासाठी 'उगवते तारे' आणि १५ –२५ वर्षे वयोगटासाठी 'इंद्रधनू ' हे कार्यक्रम होतात. भरतनाट्यम्, कथ्थक, कुचीपुडी, ओडिसी, वेस्टर्न डान्स आदि नृत्य प्रकारांबरोबरच शास्त्रीय गायन, भावगीते, वाद्यवादन, भक्तीगीते, चित्रपटगीते, नाट्यगीते, पोवाडे यांचे गायन, सुगम संगीत असे विविध कलाविष्कार हे उगवते व नवोदित कलाकार सादर करीत असतात. एका अर्थाने हा प्रज्ञाशोध मानावा लागेल.

- महिलांच्या कलागुणांना वाव देणारा आणि त्यासाठी व्यासपीठ निर्माण करणारा महिला महोत्सव हजारो सहभागी महिलांच्या आत्मविश्वासात भरच टाकत राहिला आहे.

- **पुणे फेस्टिव्हलमध्ये व्हिंटेज कार रॅली** – पुणे फेस्टिव्हल व्हिंटेज कार रॅली ही देखील पुणेकरांची अतिशय आवडती रॅली बनली आहे. गेल्या १०० वर्षातील जुन्या तसेच अत्याधुनिक अशा मोटारींचा व मोटार सायकलींचा त्यात समावेश असतो. रोल्स रॉइस, हंसा, ॲडलर, ब्युक्स, जग्वार, एजेएस, बीएसए, नॉर्टन, ट्रंफ अशा अत्यंत दुर्मिळ गाड्या तसेच अगदी मर्सडिज, फेरारी, लॅबार्गीनी, बीएमडब्ल्यू, होंडा, कावासाकी, यमाहा, सुझुकी इ. आधुनिक गाड्या बघताना नेत्राचे पारणे फिटते.

- पुणे फेस्टिव्हलमध्ये बंगाली, गुजराती, सिंधी,हिंदी, इंग्रजी गाजलेल्या नाटकांचे प्रयोग होतात. तसेच केरळ महोत्सव, कोल्हापूर महोत्सव होतो.

- **पुणे फेस्टिव्हलमध्ये मराठी कार्यक्रमांची रेलचेल** – स्व.पु.ल.देशपांडे आणि स्व.शांताबाई शेळके यांच्यावरील कार्यक्रम, मराठी हास्यकवी संमेलन, मराठी नाटके, एकपात्री मराठी हास्योत्सव,मराठी हास्यभूषण स्पर्धा, पुरूषोत्तम करंडक स्पर्धेतील विजेत्या तीन मराठी एकांकिकांचे प्रयोग, राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्या एकांकिकेचा प्रयोग, लावणी महोत्सव, मराठी भावगीते व मराठी चित्रपट गीतांचे कार्यक्रम, नाट्यगीते, प्रभात चित्रपटाच्या ७५ व्या वर्षानिमित्य विशेष कार्यक्रम, सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त गीतरामायण अशा अनेक मराठी कार्यक्रमांची पुणे फेस्टिव्हलमध्ये रेलचेल असते.

- मराठमोळी लावणीला व्यासपीठ मिळवून देण्यातही पुणे फेस्टिव्हलचा पुढाकार राहिला.

- दरवर्षी अनेक देशांचे भारतातील राजदूत आणि वाणिज्य प्रतिनिधी आवर्जून पुणे फेस्टिव्हलसाठी येतात.

- गोल्फ स्पर्धेतही सहभागी होतात. अनेक परदेशी पर्यटक आणि परदेशी ट्रॅव्हल रायटर्सही येतात.

- चीन मधील ॲक्रोबॅटस कलावंतांनी 'भारत–चीन मैत्री वर्षानिमित्त्य' ६ वर्षापूर्वी पुणे फेस्टिव्हलमध्ये अतिशय सुंदर कलाविष्कार सादर केला.

- पुणे फेस्टिव्हल ही इव्हेंट मॅनेजमेंट स्कूल मानावे लागेल.

- सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी आणि सोसायट्यांमधील गणेशोत्सव व उपक्रमांसाठी पुणे फेस्टिव्हल तर्फे घसघशीत बक्षिसांची स्पर्धाही दरवर्षी आयोजित केली जाते.

- पुणे फेस्टिव्हलमधील हे सारे कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असतात.

- दुष्काळ असो वा पूरस्थिती असो, पुणे फेस्टिव्हलतर्फे मदत म्हणून भरीव निधी दिला जातो.

- पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष सुरेश कलमाडी असून, मुख्य संयोजक कृष्णकांत कुदळे आहेत.

- www.punefestival.com

**प्रवीण प्र. वाळिंबे**
**मीडिया कोऑर्डिनेटर**
**९८२२४५ ४२३४ / ९४०५० ३५४५८**